## एकात्मिक बाल विकास सेवा योजना, (जिल्हा कक्ष), महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, नांदेड.

### 1. कार्यालयाची संक्षिप्त माहिती-

महिला व बाल विकास विभागामार्फत जिल्ह्यातील 14 ग्रामिण व 03 आदिवासी क्षेत्रातील असे एकूण 17 प्रकल्पांतर्गत 3723 अंगणवाडी केंद्र चालविण्यांत येतात ज्याद्वारे 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना पूढील प्रमाणे विविध सेवा पुरविण्यांत येतात.

1. पुरक पोषण आहार.
2. पूर्व प्राथमिक अनौपचारिक शिक्षण.
3. आहार व आरोग्य शिक्षण.
4. लसिकरण.
5. आरोग्य तपासणी.
6. संदर्भ सेवा.

या शिवाय शासन निर्णय दिनांक- 24 जानेवारी 2014 अन्वये सुचित करण्यांत आल्यानुसार महिला व मुलींच्या वैयक्तिक तसेच सामुहिक विकासासाठी शासन निधी तसेच जिल्हा परिषद उपकर निधीतून निधीच्या उपलब्धते नुसार विविध योजना राबविण्यांत येतात.